# वेध वर्तमानातील भविष्याचा

– राजकुमार मगदुम

२१ सप्टेंबर २०१३ मधील पुणे येथील 'वेध' कार्यक्रम झाला तो अविस्मरणीय असा म्हणावा लागेल. कारण या वेध मधील सर्वच व्यक्ती उत्तुंग व्यक्तिमत्त्व लाभलेल्या होत्या आणि या उत्तुंग व्यक्तिमत्त्वातील वैविध्यपूर्ण बाबी ऐकायला मिळाल्या. काहींचे कर्तृत्व पाणी, काहींचे जंगल, अवकाश आणि अंधारातून प्रकाशवाटा शोधणारे असे कर्तृत्व पाहून अचंबितच व्हायला होतं.

कोकणासारखा ग्रामीण भाग लक्षात घेता विद्यार्थ्यांची बुध्दिमत्ता, त्यांची धडपड आणि जिद्द इ. बाबतीत बरेचसे विद्यार्थी प्रयत्नशील दिसतात. परंतु त्यांची झेप म्हणावी तेवढी उंच जात नाही. पालक, शिक्षक आणि विद्यार्थी तीनही घटक एकत्र येऊन कार्य केले तरी मर्यादा येतात, त्या बाह्य गोष्टींच्या. येथील वातावरण आणि मर्यादित सुविधा लक्षात घेतल्यास पुण्यासारख्या मोठ्या शहरांपेक्षा कितीतरी मागे आहोत हे लक्षात येते. परंतु ह्याची जाणीव ठेऊन मला असे वाटते की वर्तमानातील भविष्याचा वेध घेणारी ही एक संस्था आहे, जी यामध्ये मोलाची भर घालते आहे. २०१३ अखेर ठाणे, पुणे व लातूर इ. ठिकाणच्या 'वेध' चे एकूण ४१ कार्यक्रम झाले ते कार्यक्रम सर्वांना खूप मोठी प्रेरणा देऊन जातात. मग तो शिक्षक असो, पालक असो विद्यार्थी तर आहेच. परंतु सर्वांनाच अत्यंत प्रेरणादायी व स्फूर्तिदायी असा हा कार्यक्रम आयोजित केला जातो. जीवनात प्रत्येक व्यक्ती स्वत:चे अस्तित्व दाखविण्यासाठी खूप धडपडत असते. जाणीवपूर्वक स्वत:चे व्यक्तिमत्त्व जोपासण्याकरिता ते जास्त प्रभावी बनविण्यासाठी तसेच व्यक्तिमत्त्वास विविध पैलू निर्माण करण्यासाठी या 'वेध' सारखा कार्यक्रम अतिशय उत्तम वाटतो. पुणे येथील वेधला प्रत्यक्ष उपस्थित राहणे हे दातार क्लासचे मा. श्री. पळशीकर सर व मा. श्री. श्रीरंग बापट सर यांच्या प्रयत्नाने शक्य झाले. त्या वेधमधील लेफ्ट. कर्नल श्री. श्रीकांत दोंदे सर, लेफ्ट. कर्नल श्री. अभिलाष टॉमी, रोहिणी राऊ, शीतल महाजन, डॉ. कृष्णमेध कुंटे आणि अत्यंत प्रभावशाली व्यक्तिमत्त्व ठरले ते म्हणजे सॅब्रिए टेंबरकेन हिचे ही सर्वच व्यक्तिमत्त्वे आम्हाला कायम प्रेरणा देणारी, आम्हा सर्वांमध्ये ऊर्जा निर्माण करणारी ठरतील. दुर्गम भागातील तसेच खेडेगावातील एखादा विद्यार्थी हा कार्यक्रम पाहून निश्चितच उत्कृष्ट प्रयत्न करू शकेल. अशी ही सर्व थोर माणसे आहेत. खऱ्या अर्थाने माणसाच माणूसपण जागृत ठेवणारी विद्यार्थ्यासमोर खरोखर एक आदर्श निर्माण करणारी ही व्यक्तिमत्त्वे आहेत. आमचे विद्यार्थी आजपर्यंत हे पुस्तकात लिहिलेले, वर्तमानपत्रात वाचत असतील, कुठेतरी टी. व्ही वर एखादी बातमी पाहत असतील. परंतु हीच माणसे प्रत्यक्ष आपल्या समोर अनुभव व्यक्त करतात व संपूर्ण जीवनाचा खऱ्या अर्थाने कसा आस्वाद घेतात. हे शीतल महाजन, डॉ. कृष्णमेध कुंटे यांच्या अनुभवातून प्रत्यक्ष जाणवल्यासारखे आहे. सर्वसाधारण दिसणाऱ्या व्यक्तिसुध्दा आयुष्यात यशस्वी झालेल्या दिसतात त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे रोहिणी राऊ, अभिलाष टॉमी ही आहेत. विद्यार्थी दशेपासूनच त्यांच्या आयुष्याला जी कलाटणी मिळाली आहे; ती आमच्याही विद्यार्थी दशेत आम्हाला योग्य वेळेस मिळो, हीच अपेक्षा आमचा विद्यार्थीही करीत आहे. एखादी गोष्ट करायची हे ठरविल्यानंतर त्याकरिता धडपडणं, सतत प्रयत्नशील असणं, जिद्दीनं त्यास सामोरं जाणं, कितीही संकटे व अडचणी आल्यातरी आपल्या ध्येयाप्रत पोहोचणं, हे कसं शक्य आहे ? ते आपणही असं करू शकतो ? आपणासही करावयास हवे, ही जिद्द निश्चितच अशाप्रकारे 'वेध' च्या माध्यमातून निर्माण होत आहे. आम्ही सात-आठ जणं शिक्षक कार्यक्रमास हजर होतो तेव्हा आम्हालाही यातून खूप अविस्मरणीय अशा अनेक बाबी जाणवल्या की त्या आजही करणे शक्य आहे. हीच प्रेरणा आम्ही आमच्या मनामध्ये जागृत ठेवली आहे. प्रत्यक्ष अध्ययन व अध्यापन करताना त्याचा निश्चितच खूप चांगल्या प्रकारे अनुभव येतो; तो सुखावह वाटतो. आम्हा शिक्षकांचेही असे कर्तृत्व का असू नये? असेही वाटते. वेगवेगळ्या पध्दतीने शिक्षकही यातील अनेक बाबी आत्मसात करत आहेत व भविष्यातही ते करतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे आजही आम्हाला येऊ घातलेला ५० वा 'वेध' आकर्षित करतो आहे. तितक्याच स्वयं प्रेरणेने उत्सुक असलेले आमचे शिक्षक ५० व्या पुण्यातील वेधला उपस्थित राहणार आहेत. सर्वांनाच हा कार्यक्रम खूप उत्साहवर्धक व प्रेरणादायी ठरो हीच मनोमन ज्ञानदीप परिवाराची सदिच्छा !

– राजकुमार मगदुम
ज्ञानदीप प्रशाला, खेड, रत्नागिरी